सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३२७ | गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५०७०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३९७०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११६५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३४०/- |

भाव प्रती १० ग्राम




# नेताजी सुभाषचंद्रबाबूंच्या पुतळ्याची दुरवस्था!

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या स्वयंस्फूर्त पुढाकारातून स्वच्छता, जलाभिषेक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आझादी दूंगा' या रणगर्जनेतून देशवासीयांना स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा देणारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या शहरातील पुतळ्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सामाजिक कार्यकर्ते विजय धनराज पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेत पुतळा परिसराची स्वच्छता करून पुतळ्यावर जलाभिषेक करून पूजन केले.

पुतळा परिसरात अस्वच्छता होती, तसेच रोषणाईची विद्युत व्यवस्थाही कोलमडली असल्याने राष्ट्रपुरुषांच्या स्मारकाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत होती. ही परिस्थिती पाहून प्रशासनाच्या प्रतीक्षेत न राहता विजय पाटील यांनी सहकारी तरुण कार्यकर्त्यांसह पुतळा परिसराची स्वच्छता केली.

त्यानंतर पुतळ्यावर जलाभिषेक करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादनही करण्यात आले. यावेळी विजय पाटील म्हणाले, की स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतींचा सन्मान करणे ही प्रशासनाची मर्जी नसून राष्ट्रधर्माची जबाबदारी आहे.

राष्ट्रनायकांच्या स्मारकांची स्वच्छता व देखभाल ही नियमितपणे झाली पाहिजे. पालिका प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन पुतळा परिसराची नियमित स्वच्छता, देखभाल तसेच बंद असलेली विद्युत रोषणाई तातडीने दुरुस्त करावी, अशी मागणीही केली. राष्ट्रपुरुषांप्रतीचा आदर केवळ भाषणांपुरता मर्यादित न ठेवता तो प्रत्यक्ष कृतीतूनही दिसला पाहिजे. या स्वयंस्फूर्त सेवाकार्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



*अमळनेर : शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी पुतळा परिसर स्वच्छतेसह जलाभिषेक करून पुष्पहार अर्पण केल्यानंतर अभिवादनासाठी एकत्रित आलेले सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील व त्यांचे सहकारी.*



*अमळनेर : अकरा दिवसांतच चार मोठे आघात घडल्याने बुधवार, दि. १९ ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्रण दिनाचा कार्यक्रम ज्येष्ठ फोटोग्राफर बांधवांच्या हस्ते कॅमेरा पूजन करून अतिशय साध्या पद्धतीने साजरा करताना अमळनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनचे पदाधिकारी.*

# अकरा दिवसांतच चार मोठे आघात!

## अमळनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनने घडविले माणुसकीचे दर्शन

**छायाचित्रण दिन साधेपणाने साजरा**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यातील फोटोग्राफर बांधवांवर अवघ्या ११ दिवसांत चार मोठे आघात झाले. त्यामुळे यंदा बुधवार, दि. १९ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा जागतिक छायाचित्रण दिन फोटोग्राफर बांधवांनी अतिशय साधेपणाने साजरा केला. कोणताही मोठा कार्यक्रम न करता ज्येष्ठ फोटोग्राफरांच्या हस्ते कॅमेरा पूजन करून या दिवसाचे औचित्य साधण्यात आले.

अमळनेर शहराला अतिवृष्टीमुळे दि. ३१ जुलै रोजी आलेल्या महापुराचा मोठा फटका बसला. त्याची झळ फोटोग्राफर बांधवांनाही मोठ्या प्रमाणात बसली. पिंपळे नाला आणि बोरी नदी यांना आलेल्या पुरामुळे शहरासह तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले. या पूरपरिस्थितीत फोटोग्राफर प्रेम पाटील व प्रणव महाजन यांच्या स्टुडिओचे मोठे नुकसान झाले. यातून सावरतानाच दि. ३ ऑगस्ट रोजी मांडळ येथील फोटोग्राफर उदय बच्छाव यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. उदय यांच्या पत्नी गायत्री यांना प्रसूतीसाठी धुळे येथे दाखल करण्यात आले होते. त्यांनी जुळ्या कन्यांना जन्म दिला. मात्र, नियतीने त्यांच्यावर घाला घातला आणि प्रसूतीनंतर केवळ दोन दिवसांत गायत्री यांचे निधन झाले. या दुःखातून सावरत असतानाच दि. १० ऑगस्ट रोजी फोटोग्राफर आनंद पाटील यांच्या वहिनी व हेमंत पाटील यांची पत्नी ऊर्मिला पाटील यांचेही निधन झाले. त्यामुळे फोटोग्राफर बांधवांमध्ये पुन्हा शोककळा पसरली. या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनने यंदाचा जागतिक छायाचित्रण दिन अतिशय साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला. कार्यक्रमावर होणारा खर्च टाळून त्यासाठीच्या निधीची रक्कम उदय बच्छाव यांच्या जुळ्या चिमुकलींच्या भविष्यासाठी देण्याचा निर्णय घतला. ही रक्कम या मुलींच्या नावाने मुदतठेवीच्या स्वरूपात बँकेत ठेवली जाणार आहे. विशेष म्हणजे पुरामुळे स्वतःचे मोठे नुकसान झालेले प्रेम पाटील आणि प्रणव महाजन यांनीही "आमच्यापेक्षा या चिमुकल्यांना मदतीची अधिक गरज आहे," अशी भावना व्यक्त करून मदतीसाठी पुढाकार घेतला. संकटकाळात आपणच आपल्या सहकाऱ्यांच्या पाठीशी खंबीरतेने उभे राहायचे, ही भावना रुजवत अमळनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनने यंदाचा जागतिक छायाचित्रण दिन साधेपणाने साजरा करत माणुसकीचा आदर्श निर्माण केला आहे.

# अमळनेर तालुक्यात विविध घटनांत पाच जणांचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील विविध ठिकाणी पाण्यात बुडाल्याने दोघांचा, सायकलवरून शेतात जाताना चक्कर आल्याने एकाचा, तर विविध आजारांमुळे दोघांचा अशा एकूण पाच जणांचा एकाच दिवशी मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या.

या सर्व घटनांप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दहिवद येथील बबन भीमराव पाटील (वय ६०) हे गेल्या चार-पाच दिवसांपासून बेपत्ता होते. सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता त्यांचा पुतण्या जगदीश शांताराम पाटील यांना बबन पाटील यांचा मृतदेह ग्रामपंचायतीच्या विहिरीत तरंगताना आढळून आला. याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली. या घटनेचा हवालदार सुनील जाधव तपास करीत आहेत. सावखेडा येथे निलेश मधुकर धनगर (वय २९, रा. किनगाव, ता. यावल) यांचा शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी तापी नदीत बुडाल्याने मृत्यू झाला. या घटनेचा हवालदार संदेश पाटील तपास करीत आहेत. दरम्यान, पैलाड येथील साईबाबा मंदिराजवळ राहणारे शिवाजी उत्तम पाटील (वय ४६) हे रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी साडेनऊ वाजता सायकलवरून शेतात जाताना चक्कर आल्याने खाली पडले. त्यात ते बेशुद्ध होऊन त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा पोलिस शिपाई उदय बोरसे तपास करीत आहेत. मंगरूळ येथील हेमंत विश्वास पाटील (वय ४४) यांचा रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता आजारपणामुळे मृत्यू झाला. तसेच शहरातील फरशी रोडवरील समाधान बच्छाव (वय ३९) यांचा रविवार, दि. ऑगस्ट १६ रोजी दुपारी पावणेचार वाजता छातीत दुखत असल्याने मृत्यू झाला. या दोन्ही घटनांचीही पोलिसांत नोंद करण्यात आली आहे.

# निरोगी आणि दीर्घायुष्य हवे, तर पाळा आयुर्वेदातील ५ सुवर्ण सूत्रे!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुर्वेदानुसार निरोगी आणि दीर्घायुष्य जगणे ही केवळ औषधोपचारांची पद्धत नसून, ती एक शिस्तबद्ध जीवनशैली आहे. आपल्या दैनंदिन सवयींमध्ये आयुर्वेदाचे नियम पाळल्यास शरीर आणि मन दोन्ही दीर्घकाळ तरुण व निरोगी राहतात.

**ब्राह्ममुहूर्तावर उठणे :** रोज सूर्योदयापूर्वी (सकाळी ४ ते ६ दरम्यान) उठणे अत्यंत फायदेशीर मानले जाते. या वेळी वातावरणात शुद्ध वायू आणि सकारात्मक ऊर्जा असते. तांब्याच्या भांड्यातील पाणी सकाळी उठल्यानंतर दात न घासता तांब्याच्या भांड्यात रात्रभर ठेवलेले कोमट पाणी पिणे आरोग्यासाठी उत्तम आहे.

मित आहार आणि ऋतूनुसार **भोजन :** भूक असेल त्यापेक्षा थोडे कमी जेवणे (मित आहार) आणि आपल्या भागातील स्थानिक व ऋतूला अनुसरून मिळणारे ताजे अन्न खाणे आवश्यक आहे. नियमित व्यायाम आणि योगासने शरीराला सुदृढ आणि लवचिक ठेवण्यासाठी रोज किमान ३० मिनिटे चालणे, योगासने किंवा प्राणायाम करणे गरजेचे आहे.




# भावसार समाजातर्फे समाजातील गुणवंतांचा गौरव

## विविध मान्यवरांकडून शिक्षण फंडासाठी देणगी रक्कम जाहीर



*अमळनेर : येथील भावसार क्षत्रिय समाजातर्फे रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी संतश्री सखाराम महाराज भक्त निवास, वाडी चौकात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व गुणगौरव सोहळा झाला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांसमवेत सुरेश भावसार, परेश भावसार, प्रा. डॉ. प्रभाकर जोशी, ॲड. चंद्रकांत भावसार, सुभाष सारजे, प्रकाश भावसार, मनोहर भावसार, सुभाष सारजे, प्रा. प्रवीणकुमार भावसार, सुरेश भावसार.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील भावसार क्षत्रिय समाजातर्फे रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी संतश्री सखाराम महाराज भक्त निवास, वाडी चौकात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व गुणगौरव सोहळा झाला. सुरेश सीतारामशेठ भावसार (जव्हार) अध्यक्षस्थानी होते.

समाजाचे अध्यक्ष परेश शांतीलाल भावसार यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. प्रभाकर जोशी यांच्यासह ज्येष्ठ समाजबांधव व पारितोषिकदात्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ॲड. चंद्रकांत गोकुळदासशेठ भावसार यांनी शिक्षण फंडासाठी अकरा हजार १११, सुभाष यशवंत सारजे यांनी एक हजार १११, तर प्रकाश फकिरा भावसार यांनी २०० रुपये देणगी जाहीर केली. मनोहर गुरुदास भावसार व सुभाष यशवंत सारजे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी १०१ रुपयांची पारितोषिके जाहीर केली.

प्रा. डॉ. प्रभाकर जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. प्रा. प्रवीणकुमार रणछोडदास भावसार यांनी सूत्रसंचालन केले. सुरेश नारायण भावसार यांनी आभार मानले. कार्यक्रमास समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# आदरणीयांचे ‘गोंगाट आख्यान’

विरोधक आणि सत्ताधाऱ्यांच्या कमालीच्या कटुतेच्या राजकारणात संसदेचे आणखी एक अधिवेशन वाहून गेले. लोकसभेतील कामकाज फक्त १९ टक्के, राज्यसभेत जेमतेम ४० टक्के कामकाज आणि जवळपास शहीद झालेले प्रश्नोत्तराचे तास, असे सभागृहातील कामकाजाचे प्रमाण पाहिले, तर आपल्या ‘लोकशाही’सोबतच्या ‘संसदीय’ शब्दाला किती अर्थ उरला आहे, हे लक्षात यावे. दोन्ही सभागृहांमधील चर्चेपेक्षा आवारातील आंदोलने–प्रतिआंदोलनांमधील घोषणाबाजीनेच संसदभवन दणाणून गेल्याचे चित्र मात्र दररोज दिसून आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचा संपूर्ण अधिवेशनाच्या काळात फक्त प्रारंभी आणि समारोपाच्या दिवशी ‘पाहुणे कलाकार’ म्हणून कामकाजातील सहभागही प्रथमच पाहावयास मिळाला. एकंदर संसदेमध्ये चर्चा–वाद आणि लोकोपयोगी कायदे करण्याऐवजी आपापला पक्षीय अजेंडा रेटण्याच्या अट्टाहासाचा पुढील अंक, एवढेच या अधिवेशनाचे वर्णन करता येईल. विद्यार्थ्यांचे आंदोलन–लाठीमार आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा या संपूर्ण गोंधळाच्या नाट्यात फक्त परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणांच्या विधेयकावर चर्चा झाली, तर बहुमत असूनही परकीय योगदान सुधारणा विधेयक (एफसीआरए) संयुक्त संसदीय समितीकडे गेले, एवढेच सांगण्यासारखे अपवाद.

खरे तर पावसाळी अधिवेशनापूर्वीच आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि शिवसेनेतील (उबाठा) खासदार फुटून सरकारच्या गोटात दाखल झाले होते आणि द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) विरोधी आघाडीतून दुरावली होती. त्यामुळे या अधिवेशनावर सत्ताधाऱ्यांचे वर्चस्व राहणार आणि मतदारसंघ फेररचना, एक देश–एक निवडणूक अशी विधेयके विनासायास मान्य होणार, असे चित्र निर्माण झाले होते. मात्र, ‘द्रमुक’ ने आपली झाकली मूठ अखेरपर्यंत कायम ठेवल्यामुळे संख्याबळाअभावी ही बहुचर्चित विधेयके आलीच नाहीत. संपूर्ण अधिवेशनावर पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनांचाच पगडा राहिला. पहिल्या आठवड्यात धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी, दुसऱ्या आठवड्यात दिल्लीतील लाठीमार आणि छर्रेबाराप्रकरणी शहा यांच्या निवेदनाची मागणी, हाच विरोधकांचा एककलमी कार्यक्रम होता. अखेरच्या टप्प्यात गृहमंत्र्यांच्या निवेदनाची मागणी सत्ताधाऱ्यांनी मान्य केली, तेव्हा विरोधकांनी पंतप्रधानांकडून माफीची मागणी लावून धरली. त्यामुळे विरोधक ‘गोलपोस्ट’ बदलत असल्याची टीका सरकारकडून करण्यात आली. मात्र, सुरुवातीलाच गृहमंत्र्यांकडून निवेदन करून कोंडी फोडण्याची संधी सरकारने का साधली नाही, हा प्रश्नच आहे. दुसरीकडे पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी सभागृहातील कामकाजाकडे पूर्णपणे पाठ फिरवली.

‘सरकार चर्चेपासून पळ काढते,’ हा विरोधकांचा आरोप बाजूला ठेवला, तरी या दोघांच्या गैरहजेरीचे पटण्याजोगे कारण सरकार देऊ शकले नाही, हेही तितकेच खरे. या गोंधळात परीक्षा सुधारणांचे विधेयक सोडले, तर न्यायाधिकरण सुधारणा, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (दुरुस्ती), केरळचे नामांतर, खाण व खनिजे नियमन आणि सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) दुरुस्ती, ही काही मिनिटांतच मान्य झालेली विधेयके आणि चर्चेला आलेले केवळ दोन प्रश्न, हा एकंदर कामकाजाचा लेखाजोखा. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप–प्रत्यारोपांचा खेळ रंगला असला, तरी कामकाज न चालणे कुणाच्या पथ्यावर पडते आहे का, अशी शंका आल्यावाचून राहात नाही. खरे तर गदारोळ, वैयक्तिक–अश्लाघ्य टीकाटिप्पणी आणि तहकुबी, हे या स्थितीचे केवळ लक्षण असून, परस्परांविषयी कमालीचा कडवटपणा, हा मूळ आजार आहे. ‘ विरोधक हे शत्रू नाहीत,’ या पं. नेहरू यांच्या विधानांचा दाखला नेहमीच दिला जातो; पण सध्या विरोधक हे हाडवैरी असल्यासारखीच वर्तणूक दोन्ही बाजूंकडून दिसून येते. कामकाज न झाल्याची खंत बाळगायची, की आपापले पक्षीय कार्यक्रम पुढे रेटल्याबद्दल पाठ थोपटून घ्यायची, हा ज्याचा त्याचा प्रश्न. संसदेचे गांभीर्य हरवून हेच नित्यनेमाने घडणार असेल; आपल्याच वर्तनातून संसदेचे अवमूल्यन करीत असू, तर रस्त्यावर अनादराचे प्रदर्शन करणाऱ्या ‘जेन झी’ने या ज्येष्ठ–श्रेष्ठांकडून आणि लोकशाहीतील या सर्वोच्च सभागृहाकडून काय आणि का म्हणून अपेक्षा बाळगावी?

# अंतुर्लीतील आदिवासी महिला रस्त्यातच प्रसूत


## सरपंचांसह आजी–माजी नगरसेवक धावले मदतीला!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील अंतुर्ली–रंजाणे येथील आदिवासी शेतमजूर संगीता पावरा ही दिवस भरल्याने जोरदार प्रसूतकळा येऊन रस्त्यातच पॅजो रिक्षात प्रसूत झाली. ही घटना मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी सव्वासातच्या सुमारास नंदगाव रस्त्यावरील तांबेपुरा परिसरात घडली. यासंदर्भातील माहिती प्राप्त होताच नागरिकांसह सरपंच, नगरसेवक व आजी–माजी नगरसेविका या महिलेच्या मदतीसाठी धावल्यामुळे संबंधित महिला व नवजात बाळाला वेळेत वैद्यकीय मदत मिळाली.

या घटनेची माहिती अशी, की तालुक्यातील अंतुर्ली–रंजाणे येथील आदिवासी शेतमजूर महिलेस दिवस भरल्याने जोरदार प्रसूतकळा सुरू झाल्या. त्यामुळे ती पतीसह पॅजो रिक्षातून अमळनेरकडे येण्यासाठी निघाली. मात्र, तांबेपुरा परिसरात रिक्षातच त्रास होऊन ती प्रसूत झाली. याबाबतची माहिती कळताच नगरसेविका अफसाना खाटीक, अंतुर्ली–रंजाणेचे सरपंच सचिन पाटील, माजी नगरसेवक मुख्तार खाटीक, माजी नगरसेवक बाळा पवार यांच्यासह काही महिलांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रकाश ताडे यांना ही माहिती देण्यात आली. त्यांनी तातडीने रुग्णवाहिका व योगीता कुलकर्णी यांना घटनास्थळी पाठविले. वैद्यकीय पथकाच्या मदतीने संबंधित महिलेची सुखरूप प्रसूती झाली. त्यानंतर महिला व बाळाला पुढील उपचारार्थ अमळनेर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. महिला आणि नवजात बाळ दोघांचीही प्रकृती सुखरूप असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, रस्ता खराब असल्याने प्रसूतीसाठी महिलेला रुग्णालयात पोहोचण्यास विलंब झाल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे ग्रामीण भागातील खराब रस्त्यांचा आरोग्यसेवेवर होणारा परिणाम पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.



*अमळनेर : तालुक्यातील अंतुर्ली–रंजाणे येथील आदिवासी शेतमजूर संगीता पावरा हिच्या प्रसूतीसंदर्भातील माहिती कळताच मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रकाश ताडे यांनी तातडीने घटनास्थळी पाठविलेली रुग्णवाहिका व योगीता कुलकर्णी. तसेच सरपंच, आजी–माजी नगरसेवक व नागरिक.*

# पिंपळे रस्त्यावरील गतिरोधकांमुळे अपघातांना बसला आळा!

## नगरसेविका अपूर्वाताई चौधरींच्या मागणीनंतर पालिकेकडून कार्यवाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रभाग क्र. ८ मधील पिंपळे रस्त्यावर नगरसेविका सौ. अपूर्वाताई चौधरी यांच्या प्रयत्नांतून दोन ठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनांचा वेग नियंत्रणात येत असून, अपघातांचा धोका आता कमी झाला आहे. पिंपळे रस्त्याचे काँक्रीटीकरण व रुंदीकरण झाल्यानंतर या मार्गावरून वाहने भरधाव वेगाने धावत होती.

आडव्या जोडरस्त्यांवरून मुख्य रस्त्यावर येणाऱ्या वाहनांना वळण घेताना समोरून येणारी वाहने दिसत नसल्याने किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत होत्या. याचा शालेय विद्यार्थ्यांनाही मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन जालंधर चौधरी व नगरसेविका चौधरी यांनी पालिकेकडे अर्ज करून संबंधित ठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. त्यानुसार पिंपळे रस्त्यावरील दोन क्रॉसिंगवर गतिरोधक बसविण्यात आले. त्यामुळे वाहनांचा वेग कमी होत असून, अपघातांना आळा बसण्यास आता मदत झाली आहे. दरम्यान, पिंपळे रस्त्यासह धुळे रस्ता ते पिंपळे रस्ता जोडणाऱ्या डी.पी. रस्त्यावरही आणखी गतिरोधक बसविण्यात येणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले. गतिरोधक बसविल्याबद्दल नागरिकांनी नगरसेविका चौधरी व पालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत.



*अमळनेर : येथील प्रभाग क्र. ८ मधील पिंपळे रस्त्यावर नगरसेविका सौ. अपूर्वाताई चौधरी यांच्या प्रयत्नांतून दोन ठिकाणी बसविण्यात आलेले*

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खानदेश विभाग अध्यक्षपदी डॉ. समाधान मैराळेंची निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या खानदेश विभागीय अध्यक्षपदी डॉ. समाधान एकनाथ मैराळे यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे व संघटन सरचिटणीस किशोर रायसाकडा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. खानदेशातील जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील पत्रकार संघटन बळकट करणे, पत्रकारांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणे तसेच डिजिटल



मीडिया, एआय, फेक न्यूज व आधुनिक पत्रकारितेबाबत प्रशिक्षण उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार आहे. दरम्यान, “पत्रकारांची गुणवत्ता, विश्वासार्हता आणि व्यावसायिकता वाढविण्यासाठी आपण प्राधान्याने काम करू,” असे डॉ. मैराळे यांनी सांगितले.



*अमळनेर : बजाज फायनान्सच्या कर्जवसुली प्रक्रियेदरम्यान येथील ग्राहकांना कथित धमकी, शिवीगाळ, मानसिक त्रास, आरडाओरड व अवमानजनक भाषेचा वापर करण्यात आल्याच्या तक्रारींची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी, या मागणीचे सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना निवेदन देताना शिवसेना तालुकाप्रमुख गुलाब पाटील, युवासेना तालुकाप्रमुख राहुल कंजर, युवा सेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण पाटील, विधानसभा क्षेत्रप्रमुख पंकज शेटे, उपतालुकाप्रमुख राहुल पाटील, उपतालुकाप्रमुख जयेश चव्हाण, युवा सेना उपशहरप्रमुख राजा अल्ताफ राजा शेख, युवा सेना पदाधिकारी ईश्वर जाधव, सचिन विलास पाटील व प्रदीप देशमुख आदी.*

# बजाज फायनान्सच्या कथित अरेरावीविरोधात शिवसेना, युवा सेनेचे पोलीस निरीक्षकांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बजाज फायनान्सच्या कर्जवसुली प्रक्रियेदरम्यान येथील ग्राहकांना कथित धमकी, शिवीगाळ, मानसिक त्रास, आरडाओरड व अवमानजनक भाषेचा वापर करण्यात आल्याच्या तक्रारींची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी, या मागणीसाठी शिवसेना व युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी अमळनेर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे, की विनोद पाटील (शिरूड) व वाल्मीक चौधरी (अमळनेर) यांनी कर्जवसुलीसंदर्भात बजाज फायनान्सच्या कर्मचाऱ्यांकडून मानसिक त्रास, धमकी व आक्षेपार्ह भाषेचा वापर झाल्याची तक्रार पदाधिकाऱ्यांकडे केली होती.

या तक्रारीबाबत अमळनेर येथील बजाज फायनान्सचे मॅनेजर दीपक चौधरी यांच्याशी फोनवरून चर्चा करण्यात आली. यावेळी त्यांनी उद्धट व आक्षेपार्ह पद्धतीने उत्तर दिले. तसेच कर्जाचा हप्ता थकीत असल्यास संबंधित वित्तीय संस्थेला कायद्याच्या चौकटीत राहून वसुली करण्याचा अधिकार आहे. मात्र, वसुलीच्या नावाखाली ग्राहकांना धमकावणे, शिवीगाळ करणे, अपमानित करणे अथवा मानसिक दबाव आणणे कोणत्याही परिस्थितीत योग्य नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करून संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदवावेत, उपलब्ध फोन कॉल रेकॉर्डिंग, ऑडिओ/व्हिडिओ पुरावे व संबंधित कागदपत्रांची पडताळणी करावी आणि चौकशीअंती कायद्याचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास लागू कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करावी. तसेच भविष्यात सर्वसामान्य नागरिकांना कर्जवसुलीच्या नावाखाली कोणत्याही प्रकारची धमकी, शिवीगाळ किंवा मानसिक त्रास दिला जाऊ नये, यासाठी संबंधित वित्तीय संस्थेला आवश्यक त्या सूचना द्याव्यात. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण आणि कायदेशीर मार्गाने न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना, युवा सेना ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहील. निवेदनावर शिवसेना तालुकाप्रमुख गुलाब पाटील, युवासेना तालुकाप्रमुख राहुल कंजर, युवा सेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण पाटील, विधानसभा क्षेत्रप्रमुख पंकज शेटे, उपतालुकाप्रमुख राहुल पाटील, उपतालुकाप्रमुख जयेश चव्हाण, युवासेना उपशहरप्रमुख राजा अल्ताफ राजा शेख, युवा सेना पदाधिकारी ईश्वर जाधव, सचिन विलास पाटील व प्रदीप देशमुख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जेवणानंतर गूळ–तूप खा

## पचनासह ‘या’ त्रासांपासून मिळेल आराम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेवणानंतर गूळ आणि तूप यांचे मिश्रण घेतल्याने शरीरातील दोषांचे संतुलन नैसर्गिक पद्धतीने राखण्यास मदत होऊ शकते.

गूळ आणि तूप यांचे संतुलित मिश्रण म्हणजे जेवणानंतर १ चमचा गूळ आणि १ चमचा तूप असे असू शकते.

गूळ आणि तूप हे भारतीय आहारातील पारंपरिक पदार्थ आहेत. योग्य प्रमाणात घेतल्यास ते आहारात ऊर्जा, चव आणि काही पोषक घटक देऊ शकतात.

जेवणानंतर गूळ आणि तूप खाल्ल्याने पचनक्रिया सुरळीत होते. बद्धकोष्ठतेपासून आराम मिळण्यास आणि पोषक घटकांचे शोषण सुधारण्यास मदत होऊ शकते.

आतड्यांना स्निग्धता देण्यात तुपाची महत्त्वाची भूमिका असते. ज्यामुळे मलविसर्जन सुलभ होण्यास आणि बद्धकोष्ठता कमी होण्यास मदत होऊ शकते.

गूळ हा लोह, मॅग्नेशियम



आणि पोटॅशियम यांसारख्या आवश्यक खनिजांनी समृद्ध असलेला नैसर्गिक गोड पदार्थ आहे. तो पाचक एन्झाइम्सना चालना देतो.

गूळ यकृताच्या नैसर्गिक स्वच्छता प्रक्रियेला आणि पचनसंस्थेच्या शुद्धीकरणाला मदत करतो, ज्यामुळे पोट फुगणे आणि अपचन यांसारख्या समस्या कमी होण्यास मदत होते.

गुळातील तंतुमय घटक आणि तुपाचा स्निग्ध प्रभाव यांचे संयोजन नियमित आणि निरोगी मलविसर्जनास प्रोत्साहन देण्यासाठी विशेषतः उपयुक्त ठरू शकते. आतड्यांचे आरोग्य राखणे, चयापचयाला चालना देणे आणि एकूण आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने ही जुनी, नैसर्गिक आणि सर्वांगीण पद्धत मानली जाते.

# गुलमोहराच्या झाडांवर पक्षी का बसत नाहीत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काही झाडांच्या तुलनेत गुलमोहरावर पक्षी कमी दिसत असतील, तर त्यामागे काही पर्यावरणीय व वनस्पतिशास्त्रीय कारणे असू शकतात. गुलमोहराच्या झाडाला विशिष्ट रासायनिक गुणधर्म असल्यामुळे पक्षी त्यावर बसत नाहीत. या दाव्याला सर्वसाधारण वैज्ञानिक आधार दिसत नाही. गुलमोहर या झाडाच्या फुलांना काही पक्षी भेट देतात आणि काही पक्षी त्याच्या फांद्यांवर बसतानाही आढळतात. काही अभ्यासांमध्ये सूर्यपक्षी, कोतवाल, पोपट, कोकीळ, कावळा इत्यादी पक्षी गुलमोहराच्या फुलांना भेट देताना नोंदविले आहेत. गुलमोहराचा खूप रुंद आणि पसरट पसारा. त्याच्या बारीक, अनेक उपफांद्यांवर लहान–लहान संयुक्त पाने असतात. त्यामुळे पक्ष्यांना बसण्यासाठी जागा कमी मिळते. त्यामुळे गुलमोहराच्या फांद्या पक्ष्यांना विश्रांती, निरीक्षण किंवा रात्री मुक्कामासाठी अधिक सोयीच्या असू शकत नाही. गुलमोहर पानझडी वृक्ष आहे. विशिष्ट काळात त्याची पाने कमी होतात आणि फुलांचा मोठा बहर येतो. त्यामुळे वर्षभर झाडाचा दिसणारा पोत सारखा राहत नाही. झाडावर पक्षी/परागीभवन करणारे जीव दिसतात की नाही, हे फक्त झाडाच्या प्रजातीवर नाही तर ऋतू, फुलण्याचा काळ आणि स्थानिक पर्यावरणावरही अवलंबून असते. गुलमोहरावर पक्षी बसत नाहीत हा समज पूर्णपणे बरोबर नाही. गुलमोहराची फुले काही पक्ष्यांना मकरंद व कीटकांच्या रूपाने अन्न देतात.

# घरामध्ये कासव, घुबड पाळताय? कायद्याच्या पिंजऱ्यात अडकाल!

## भारतीय तसेच विदेशी वन्यजीवांच्या बेकायदा व्यापारात सातत्याने वाढ; तक्रारही करता येणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतीय तसेच विदेशी वन्यजीवांच्या व्यापारात सातत्याने वाढ होत आहे. साप, कासव, सरडे, पक्षी, घुबड, माकडे, तसेच इतर दुर्मीळ प्रजातींचे प्राणी पाळीव प्राणी म्हणून किंवा आर्थिक फायद्यासाठी विक्रीसाठी ठेवले जात असल्याची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. जिल्ह्यात असे प्रकार फारसे नसले तरी कोणी नियमाचे भंग करीत असल्यास संबंधित व्यक्तींवर वनविभागाकडून कारवाई होऊ शकते.

**कुठे तक्रार करायची?**

कोणी वन्यजीव बेकायदेशीरपणे बाळगत असल्यास, त्यांची तस्करी करत असल्यास नागरिक याची गुप्त तक्रार करू शकतात. वन विभागाचा टोल फ्री क्रमांक, स्थानिक वन अधिकारी किंवा मानद वन्यजीव रक्षकांना याची माहिती देता येते.

**काय आहे वन्यजीव संरक्षण कायदा?**

अनेकांचा असा गैरसमज असतो, की विदेशी वन्यजीवांवर कोणतेही कायदे लागू होत नाहीत. प्रत्यक्षात विदेशी वन्यजीवांच्या आयात, ताबा, विक्री किंवा हस्तांतरणासाठी शासनाने निश्चित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. आवश्यक नोंदणी, वैध कागदपत्रे किंवा अधिकृत परवानग्या नसल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ तसेच लागू असलेल्या इतर कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई होऊ शकते



**हौसेपोटी पशुपक्षी पाळण्याचे प्रमाण मोठे**

सध्याच्या काळात घराची शोभा वाढवण्यासाठी किंवा स्टेटस म्हणून विविध प्रजातींचे पशुपक्षी पाळण्याची हौस अनेकांमध्ये पाहायला मिळते. यामध्ये शोभेचे पोपट, कासव, विविध सरपटणारे प्राणी किंवा सुंदर पक्ष्यांचा समावेश असतो. मात्र, हे पाळत असताना संबंधित पशुपक्षी वन्यजीव संरक्षण कायद्याच्या कक्षेत येतात का, याचा विचार केला जात नाही.

**भाग्योदय, अंधश्रद्धेपोटीही पाळले जातात पशुपक्षी**

घरांमध्ये वास्तुदोष निवारणासाठी किंवा घरात सुख–समृद्धी, ‘लक’ यावे, यासाठी कासव पाळले जाते. तसेच संपत्ती व लक्ष्मीच्या आगमनासाठी घुबड घरात बाळगण्याच्या किंवा तांत्रिक विधींसाठी पोपट, घुबड, घोरपड यांसारख्या वन्यजीवांचा वापर करण्यामागे जुन्या अंधश्रद्धा जोडलेल्या असतात. याच अंधश्रद्धेपोटी वन्यजीवांची अवैध शिकार व तस्करी मोठ्या प्रमाणावर केली जाते

**शिक्षा व दंडाची काय तरतूद ?**

वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन केल्यास अत्यंत कठोर शिक्षेची व दंडाची तरतूद आहे. कायद्याच्या कलम ५१ नुसार संरक्षित वन्यजीव घरात बाळगल्यास किंवा त्यांची तस्करी केल्यास तीन वर्षांपासून ते सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते. तसेच पंचवीस हजारांपासून ते एक लाख रुपयांपर्यंत किंवा दोन्ही शिक्षा एकाच वेळी होऊ शकतात.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com

# कमरे में बंद होकर की यूपीएससी की तैयारी!

## तीसरे प्रयास में पास किया यूपीएससी, जानिए आयएएस परी बिश्नोई की कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की परीक्षा पास करना लाखों युवाओं का सपना होता है, लेकिन यह मुकाम कुछ ही लोगों को हासिल होता है। राजस्थान के बीकानेर की रहने वाली आईएएस परी बिश्नोईने महज २४ साल की उम्र में यूपीएससी २०१९ में ऑल इंडिया ३०वीं रैंक हासिल कर यह सपना पूरा किया। हाल ही में सिक्किम सरकार ने उन्हें पाक्योंग जिले का जिला कलेक्टर नियुक्त किया है।

**सक्सेस स्टोरी**

### राजस्थान से शुरू हुआ आयएएस बनने का सफर

परी बिश्नोई (आयएएस परी बिश्णोई) का जन्म राजस्थान के बीकानेर में हुआ। उनके पिता मणिराम बिश्नोई पेशे से वकील हैं, जबकि मां सुशीला बिश्नोई रेलवे सुरक्षा बल में इंस्पेक्टर हैं। शुरुआती पढ़ाई अजमेर के सेंट मैरी कॉन्वेंट स्कूल से हुई, जहां उन्होंने १०वीं में ९१ प्रतिशत और १२वीं में ८९ प्रतिशत अंक हासिल किए।

### दिल्ली यूनिवर्सिटी से ग्रेजुएशन, एनईटी–जेआरएफ भी किया पास

स्कूल की पढ़ाई के बाद उन्होंने दिल्ली यूनिवर्सिटी के इंद्रप्रस्थ कॉलेज फॉर वूमेन से स्नातक किया। इसके बाद एमडीएस यूनिवर्सिटी, अजमेर से राजनीति विज्ञान में एमए किया। यूपीएससी से पहले उन्होंने एनईटी–जेआरएफ परीक्षा भी पास की।

### तीसरे प्रयास में मिली सफलता

परी बिश्नोई (आयएएस को यूपीएससी में सफलता पहले प्रयास में नहीं मिली। दो बार असफल होने के बाद उन्होंने हार नहीं मानी। तीसरे प्रयास में यूपीएससी २०१९ परीक्षा में ३०वीं रैंक हासिल कर आयएएस अधिकारी बनीं। उन्होंने बताया कि तैयारी के दौरान खुद को एक कमरे तक सीमित रखा और इंटरनेट का इस्तेमाल केवल पढ़ाई के लिए किया।

### हरियाणा के पूर्व मुख्यमंत्री के परिवार की बनीं बहू

साल २०२३ में परी बिश्नोई ने हरियाणा के पूर्व भाजपा विधायक भव्य बिश्नोई से विवाह किया। भव्य, वरिष्ठ भाजपा नेता कुलदीप बिश्नोई के बेटे हैं। कुलदीप बिश्नोई, हरियाणा के पूर्व मुख्यमंत्री भजन लाल के पुत्र हैं। इस तरह आयएएस परी बिश्नोई हरियाणा के पूर्व मुख्यमंत्री के परिवार की बहू हैं।

### अब मिली जिला कलेक्टर की जिम्मेदारी

हाल ही में सिक्किम सरकार ने प्रशासनिक फेरबदल के तहत परी बिश्नोई को सिक्किम हाउस, दिल्ली में उप आवासीय आयुक्त के पद से स्थानांतरित कर पाक्योंग जिले का जिला कलेक्टर नियुक्त किया है।



# फळे जेवणानंतर खावीत की आधी? जाणून घ्या योग्य वेळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फळे जेवणाच्या ३० ते ६० मिनिटे आधी खाल्ल्यास त्यातील पोषक घटक शरीराला अधिक चांगल्या प्रकारे मिळतात.



**पचन :** रिकाम्या पोटी किंवा जेवणापूर्वी फळे खाल्ल्याने त्यांचे पचन तुलनेने लवकर होते.

**जेवण :** जड जेवणानंतर लगेच फळे खाल्ल्यास काही लोकांना पोट फुगणे किंवा जडपणा जाणवू शकतो.

**अंतर :** जेवणानंतर फळे खायची असल्यास किमान १ ते २ तासांचे अंतर ठेवणे अधिक योग्य मानले जाते.

**फायदे :** फळांमधील फायबर, जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स शरीराच्या आरोग्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

**अपवाद :** प्रत्येकाची पचनसंस्था वेगळी असल्याने काहींना जेवणानंतरही फळे खाल्ल्याने कोणताही त्रास होत नाही.

**मधुमेह :** मधुमेह असलेल्या व्यक्तींनी फळांचे प्रमाण आणि वेळ याबाबत डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**निवड :** हंगामी आणि ताजी फळे खाल्ल्यास शरीराला अधिक पोषणमूल्य मिळण्याची शक्यता असते.

**संतुलन :** फळे हा संतुलित आहाराचा भाग आहे; ती कोणत्याही एका जेवणाचा पर्याय नाहीत.

**फायदेशीर :** बहुतेक लोकांसाठी फळे जेवणापूर्वी किंवा जेवणानंतर योग्य अंतर ठेवून खाणे अधिक फायदेशीर मानले जाते.

# ट्रकवर 'Horn OK Please' का लिहिलेले असते?




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जुन्या काळात ट्रक्सना दोन्ही बाजूंना साइड मिरर्स नसायचे. त्यामुळे मागून येणाऱ्या गाडीला ओव्हरटेक करायचे असल्यास हॉर्न वाजवून ट्रक चालकाला अलर्ट करणे गरजेचे असायचे. चालकाने हॉर्न ऐकल्यावर, पुढे रस्ता मोकळा असल्यास तो मागे असणाऱ्या गाडीला 'OK' (Over Take / Rasta Mookla Aahe) असा सिग्नल द्यायचा. 'Please' हा शब्द नम्रता दर्शवण्यासाठी आणि प्रवासात सुरक्षितता राखण्याची विनंती करण्यासाठी जोडला गेला. म्हणजेच "कृपया हॉर्न वाजवा आणि सुरक्षितपणे ओव्हरटेक करा!" दुसऱ्या महायुद्धाच्या काळात डिझेलची टंचाई होती, तेव्हा ट्रक्स केरोसीन (घासलेट) वर चालवले जायचे. केरोसीन अत्यंत ज्वलनशील असल्याने अशा गाड्यांवर 'O.K.' म्हणजेच 'On Kerosene' असा इशारा लिहिला जायचा, जेणेकरून मागची गाडी सुरक्षित अंतर ठेवेल. एका दाव्यानुसार टाटा कंपनीने जुन्या काळात 'OK' नावाचा डिटर्जंट साबण लाँच केला होता. त्याच्या ब्रँडिंगसाठी ट्रक्सच्या मागे 'Horn Please' च्या मध्ये 'OK' लिहायला सुरूवात झाली होती. आधुनिक ट्रक्समध्ये साइड मिरर्स आणि अत्याधुनिक सेन्सर्स आल्यामुळे आता 'Horn OK Please' ची गरज उरलेली नाही.

# किचन सिंकखाली 'या' ५ गोष्टी ठेवता?

## घरात गरिबी आणि आजारपण येण्यापूर्वी लगेच टाका काढून

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वास्तुशास्त्रात जलतत्त्वाला विशेष महत्त्व आहे. किचनचे सिंक हे पाण्याशी संबंधित स्थान मानले जाते. त्यामुळे या ठिकाणी चुकीच्या वस्तू ठेवल्याने जलतत्त्वावर परिणाम होतो.



**नकारात्मक उर्जा वाढते**

अनेकजण किचन सिंकच्या खाली कचऱ्याचा डबा ठेवतात. वास्तुशास्त्रानुसार ही अत्यंत वाईट गोष्ट आहे यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा येते. किचन सिंकच्या खाली ओलावा टिकून राहतो त्यामुळे तेथे ठेवलेल्या वस्तू लवकर खराब होतात.

**किचन सिंकखाली कचरा ठेवू नका**

किचन सिंक खाली कचरा साचल्याने स्वयंपाकघरात नकारात्मक येते. अस्वस्थता वाटते. घरातील ऊर्जा शुद्ध ठेवण्यासाठी कचराकुंड्या स्वयंपाकघराबाहेर किंवा योग्य ठिकाणी ठेवाव्यात.

**किचन सिंकखाली झाडू ठेवू नका**

किचन सिंकखाली झाडू ठेवणे हा वास्तदोष मानले जाते. शास्त्रानुसार, झाडू देवी लक्ष्मीशी संबधित आहे. चुकीच्या ठिकाणी झाडू ठेवल्याने लक्ष्मी नाराज होऊ शकते.

**वापरलेल्या भांड्याची ढीग ठेवू नका**

अनेक घरांमध्ये सिंकखाली घाणेरड्या, वापरलेल्या अस्वच्छ भांड्याचा ढीग साचलेला असतो यामुळे वास्तूदोष निर्माण होतो. दमट जागेत भांडी ठेवल्याने जिवाणूंची वाढ होते.

**साफसफाईचे साहित्य**

सिंकखाली द्रव, डिटर्जेंट, केमिकल्स किंवा इतर सफाईचे सामान ठेवू नका. वास्तुशास्त्रानुसार साफसफाईचे साहित्य पाण्याच्या ठिकाणापासून तसेच स्वयंपाकघरापासून दूर ठेवले पाहिजे.

**तुटलेल्या वस्तू ठेवू नका**

किचनच्या सिंकखाली जुने, प्लास्टिकचे डबे, तुटलेली भांडी ठेवणे टाळा. या वस्तूंमुळे घरात पसारा येतो आणि नकारात्मक ऊर्जा वाढते.

**अडचणी वाढतात :**

घरात चुकीच्या वस्तू ठेवल्याने नकारात्मकता, मानसिक ताण, आर्थिक अस्थिरता, कौटुंबिक वाद वाढू शकतात.

# घरातील उंदीर, पाली, डास पळविण्यासाठी काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरात उंदीर, पाली आणि डास मोठ्या प्रमाणावर झाले असतील, तर काही घरगुती उपाय करता येईल. ज्यामुळे उंदीर, पाली, डास कायमचे पळून जातील.



**१) सुरूवात :** आज आपण पाहणार आहोत एक असा सोपा आणि चमत्कारिक घरगुती उपाय, की ज्यामुळे घरातील उंदीर, पाली आणि डास कायमचे पळून जातील. हार्पिकचा हा वापर पाहून तुम्हीही थक्क व्हाल.

**२) लागणारे साहित्य :**

हार्पिक – २ चमचे

बेकिंग सोडा किंवा डेटॉल – १ चमचा

गव्हाचे किंवा मक्याचे पीठ – २ ते ३ चमचे

थोडे पाणी

**३) कृती :** मिश्रण तयार करणे : एका प्लास्टिकच्या जुन्या वाटीत २ चमचे गव्हाचे पीठ घ्या.

घटक मिसळणे : त्यात १ चमचा डेटॉल किंवा बेकिंग सोडा टाका आणि २ चमचे हार्पिक घाला.

गोळे बनविणे : हे सर्व नीट मिक्स करून त्याचे छोटे-छोटे गोळे तयार करा.

**४) वापरण्याची पद्धत** : उंदरांसाठी : हे गोळे उंदीर येण्याच्या जागी, स्वयंपाकघराच्या कोपऱ्यात किंवा गॅसशेगडीखाली ठेवा.

पाली आणि डासांसाठी : या मिश्रणात थोडे पाणी घालून स्प्रे बाटलीत भरा आणि खिडक्या किंवा दरवाजांच्या कोपऱ्यात फवारा.

# मुकेश अंबानींच्या लक्झरी गाड्या चालवणाऱ्या ड्रायव्हरचा पगार किती?


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशातील सर्वांत श्रीमंत उद्योगपती म्हणून ओळखले जाणारे मुकेश अंबानी हे कायमच चर्चेत असतात. ते ज्या महागड्या गाड्यांमधून प्रवास करतात त्या गाड्या चालवणाऱ्या ड्रायव्हरला किती पगार आहे? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. चला जाणून घेऊया...



मुकेश अंबानी आपल्या २७ मजली अपार्टमेंट अँटिलियामध्ये संपूर्ण कुटुंबासोबत राहतात. आशियातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती हे आयकॉनिक रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (आरआयएल)चे संस्थापक, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. त्यांचे नाव जगातील श्रीमंत व्यक्तींच्या यादीमध्ये सामिल झाले आहे. आता अनेकांना प्रश्न पडला आहे की मुकेश अंबानी यांच्या ड्रायव्हरचा पगार किती? अंबानी कुटुंब अतिशय लक्झरी जीवन जगते आणि त्यांच्याकडे अनेक भव्य राजवाडे, खासगी जेट आणि अत्यंत आलिशान गाड्या आहेत. त्यांच्याकडे असलेल्या गाड्या या देशातील क्वचितच कोणाकडे आहेत. ते आपल्या ड्रायव्हर्स, शेफ्स आणि कर्मचाऱ्यांना आकर्षक पगारही देतात. त्यांना विमा फायद्यांव्यतिरिक्त विविध भत्ते आणि सुविधाही दिल्या जातात.

एका अहवालानुसार मुकेश अंबानी यांची निव्वळ संपत्ती १०३ अब्ज अमेरिकी डॉलर आहे. जर तुम्ही बारकाईने निरीक्षण केले असेल, तर तुम्ही पाहिले असेल की मुकेश अंबानी आणि त्यांचे कुटुंब नेहमी बुलेटप्रूफ गाड्यांमध्ये, बॉडीगार्ड्ससोबत ये-जा करतात. पण तुम्ही कधी अंबानी यांच्या ड्रायव्हरच्या पगाराबद्दल विचार केला आहे का, जो आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्तीला आणि त्यांच्या कुटुंबाला घेऊन जातो?



मुकेश अंबानी यांच्या लग्झरी गाड्या चालवणाऱ्या ड्रायव्हरला दरमहा जवळपास २ लाख रुपये पगार आहे. त्याचा वार्षिक पगार जवळपास २४ लाख रुपये होतो. मुकेश अंबानी यांच्या ड्रायव्हरच्या पगाराची माहिती २०१७ मध्ये समोर आली होती. त्यामुळे आता अंबानी यांच्या ड्रायव्हरच्या पगारामध्ये चांगली वाढ झाली असावी असे म्हटले जात आहे.

# घराचे खोदकाम करताना चकाकला सोन्याचा तुकडा, नंतर पाहिले तर सापडला एवढा मोठा खजिना!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बेल्जियममधील ईस्ट फ्लँडर्समध्ये एका घराचे नूतनीकरण सुरू असताना कामगारांना भिंतीमध्ये सोन्याचा प्रचंड मोठा खजिना सापडला आहे. या खजिन्याची किंमत सुमारे ९० लाख युरो किंवा अंदाजे ९८ कोटी रुपये आहे. या भिंतीमध्ये सोन्याच्या विटा आणि नाणी सापडली आहेत. स्थानिक माध्यमांनुसार सांडपाण्याच्या ड्रेनेज लाईनसाठी खोदकाम करताना कामगारांना हा खजिना सापडला. पण हा खजिना सापडल्यानंतर या सोन्याचा मालक कोण असेल, याबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. कामगार तसेच जागेची मालकी असलेल्या स्थानिक संस्थेला या खजिन्यावर दावा करण्याची संधी आहे. याबाबत तपास सुरू केल्यानंतर लोकांनी आणखी खजिना शोधायला जाऊ नये, असा इशारा पोलिसांनी लोकांना दिला आहे. घराची कसून तपासणी करण्यात आली असून सर्व सोने सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. एका इमारतीचे बांधकाम करत असताना कामगारांना हे सोने सापडले. त्यांच्यात एक १८ वर्षांचा विद्यार्थी होता. हा विद्यार्थी उन्हाळ्याच्या सुटीत थोडे अतिरिक्त पैसे कमवण्यासाठी काम करत होता.



"सुरूवातीला आम्हाला विश्वासच बसला नाही आणि खूप धक्का बसला होता," असे कोबे नावाच्या विद्यार्थ्याने बेल्जियमच्या सार्वजनिक प्रसारक व्हीआरटीला सांगितले. "सुरूवातीला मला वाटले की ही युरोची नाणी आहेत. पण नंतर आम्हाला तिथे सोन्याचा एक तुकडाही दिसला. तेव्हाच आमच्या लक्षात आले की हे काहीतरी मोठे आहे," असे तो म्हणाला. यानंतर लगेचच त्याने पोलिसांना याबद्दल माहिती दिली आणि हा खजिना स्वतःजवळ ठेवणे शक्य नसल्याचे सांगितले. "तिथे सोन्याची इतकी नाणी आणि बिस्किटे आहेत की तसे करणे जवळजवळ अशक्य आहे. शिवाय, ती चोरी ठरेल," असे साईट मॅनेजर मारिओ यांनी व्हीआरटीला सांगितले. कोबीने सहमती दर्शवत, "९० लाख युरो, ही रक्कम लपवता येणार नाही," असे म्हटले. ज्या ठिकाणी सोने सापडले ती जागा सध्या या संस्थेच्या मालकीची आहे, डेंडरमोंडे प्रदेशातील लोकांना सामाजिक आणि कल्याणकारी मदत पुरवण्याचं काम ही संस्था करते. संस्थेचे संचालक, गिर्ट हिलर्ट यांनी पहिली प्रतिक्रिया अत्यंत धक्कादायक आणि आश्चर्यचकित करणारी होती, असे सांगितले. या खजिन्याचा उपयोग भविष्यात संस्थेच्या कामाला पाठबळ देण्यासाठी आणि 'दररोज निर्माण होणारी मोठी गरज' भागवण्यासाठी केला जाऊ शकेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. स्थानिक पोलिसांनी लोकांना बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी खजिना शोधण्यासाठी जाऊ नये, असे आवाहन केले आहे. पोलिसांनीही फेसबुकवर या खजिन्याचे फोटोही पोस्ट केले आहेत. या ठिकाणी सापडलेले सोने 'योग्य ठिकाणी' पोहोचेल आणि लोकांचे जीवन बदलेल, अशी आशा पोलिसांनी व्यक्त केली आहे.

**सोने कुणाला मिळेल?**

बेल्जियन कायद्यानुसार मूळ मालकाला खजिन्यावर दावा करण्यासाठी पाच वर्षांचा कालावधी असतो. मात्र, या प्रकरणाचा तपास करणाऱ्या स्थानिक सरकारी वकिलांनी मालक कोण आहे, हे अद्याप समजले नसल्याचे म्हटले आहे. कोणी पुढे आले नाही, तर कायद्यानुसार दुसऱ्याच्या जमिनीवर लपवलेला खजिना शोधणारी व्यक्ती आणि जागेच्या मालकामध्ये विभागला जातो. पण या खजिन्याचा संबंध गुन्ह्याशी नाही हे सिद्ध झाल्यानंतरच तसे करता येईल. सध्या बांधकाम व्यावसायिक आणि संस्था या दोघांनाही मालक सोमर येईपर्यंत १८२३ दिवस वाट पाहावी लागू शकते. या काळात कोणी पुढे येऊन खजिना त्याचाच असल्याचे सिद्ध केले नाही, तर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.





# आज श्रावणी गुरुवार : प्रार्थना करा अन् लवकर फळ मिळवा ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी वर्षात महत्त्वाचा मानला गेलेला सात्त्विक काळ चातुर्मास सुरू झाला. संपूर्ण मराठी वर्षात चातुर्मासाला सर्वाधिक महत्त्व आहे. यंदाच्या वर्षी श्रावण महिना अधिक आल्यामुळे चातुर्मास विशेष ठरला. यानंतर आता निज श्रावण मास सुरू झाला आहे. श्रावणातील दुसरा गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ रोजी आहे. श्रावणी गुरुवारी बृहस्पती पूजन केले जाते. श्रावण महिना महादेवांना समर्पित असल्याचे म्हटले जाते. माणूस विविध माध्यमातून भगवंताला भजत-पूजत असतो. आयुष्याचे कल्याण व्हावे, सुख-समृद्धी लाभावी, पैसा-अडका, धन-धान्य-वैभव प्राप्त व्हावे, यासाठी करत असलेल्या कष्टासह आपल्या आराध्याला प्रार्थनाही करत असतो.

अक्कलकोटचे स्वामी समर्थ हे दत्तात्रेयाचे अवतार मानले जातात. स्वामींनी समाजाला 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे', हा दिलासा दिला. खुद्द स्वामी आपली पाठराखण करत आहेत, हा विश्वास आजही हजारो भक्तांना जगण्याचे बळ देतो.

## स्वामींचा उपदेश कायम लक्षात ठेवा!



स्वामी प्रत्यक्ष रूपाने सोबत नसले, तरी स्वामी कृपेने त्यांचे सान्निध्य भाविकांना पदोपदी जाणवते. अशक्यही शक्य करतील स्वामी, अशी स्वामी भक्तांची अनन्य श्रद्धा आहे. केवळ 'श्री स्वामी समर्थ' असा नामोच्चार केला, तरी एक वेगळी सकारात्मकता मिळते, असा अनेकांचा अनुभव आहे. देवाने आपली इच्छा पूर्ण करावी असे प्रत्येकाला वाटते. प्रार्थना सगळेच करतात, परंतु सगळ्यांचीच प्रार्थना फळतेच असे नाही. का? याचे कारण स्वामी समर्थ महाराज एक दृष्टांत देऊन सांगतात.

**सगळे भक्त स्वामींना शरण गेले**

एकदा समस्त शिष्यांसमवेत स्वामी समर्थ महाराज प्रवासात निघाले होते. प्रवासात असताना अवकाळी पाऊस सुरू झाला. स्वामींची सोबत असूनही सगळे बिथरले होते. सर्वांनी एका झाडाचा आश्रय घेतला. सगळे जण पाऊस थांबण्याची वाट पाहत होते. परंतु पावसाचा जोर वाढतच चालला होता. असेच चालत राहिले तर पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होईल. या भीतीने सगळे भक्त स्वामींना शरण गेले. तेव्हा स्वामी म्हणाले, 'अरे अशी गयावया करण्यापेक्षा त्या पावसाला हात जोडून विनवणी करा. प्रार्थना करा. सर्वांनी मनापासून प्रार्थना केली, तर तो तुमचं नक्की ऐकेल. प्रार्थनेत शक्ती असतेच परंतु सामूहिक प्रार्थना लवकर फळते. यासाठी सर्वांनी एकमुखाने एकदिलाने प्रार्थना करा.'

**एखादी गोष्ट तळमळीने केली, तर तिचे फळ निश्चित मिळते**

सर्वांना स्वामींचे म्हणणे पटले. सर्व भक्तांनी प्रार्थना केली आणि काय आश्चर्य... पाऊस कमी होत होत पूर्ण थांबला! तात्पर्य हेच, की स्वामी सांगतात, एखादी गोष्ट तळमळीने केली, तर तिचे फळ निश्चित मिळते. प्रार्थना अशी करा, की समोरच्याला तुमचे ऐकावेच लागेल. एवढी शक्ती तुमच्या शब्दामध्ये आणि भावनेमध्ये

असायला हवी. तर ती खरी प्रार्थना! मागणे असे मागावे ज्यात केवळ आपल्या हिताचा नाही तर समष्टीचा अर्थात सर्व जीव सृष्टीच्या भल्याचा विचार केला असेल. दुसऱ्याचे वाईट आणि माझे चांगले ही भावना असेल तर तुमची इच्छा कधीच पूर्ण होणार नाही हे कायम लक्षात ठेवा. स्वामी समर्थ सर्वांचे कल्याण करतील,

त्यासाठी आपणही समतेने, ममतेने, आपुलकीने सर्वांचा विचार करायला हवा, असा उपदेश श्री स्वामी समर्थ महाराजांनी केला.

# श्रावणातील गुरुवारी स्वामींसमोर बोला फक्त 'हा' मंत्र


## स्वामीकृपेचे फळ निश्चित मिळणार; कसा म्हणाल मंत्र!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री स्वामी समर्थ महाराजांची कृपा लवकर व्हावी, यासाठी काय करावे? हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. आपल्या अमूक इच्छेसाठी बरेच जण स्वामींना साकडे घालतात, तर मनापासून स्वामीसेवा देखील करतात. काही वेळा आपले प्रारब्धाचे कर्म असल्याने देखील मनोकामना लवकर पूर्ण होताना दिसत नाहीत किंवा अनेक अडचणी आयुष्यात येतात. परंतु एका सोप्या स्वामीसेवेने आपल्या भाग्याचे दरवाजे उघडतील असे जर सांगितले तर आश्चर्य वाटून घेऊ नका. कारण स्वामींची मनोभावे कोणतीही सेवा केली तर त्याचे फळ हे निश्चित मिळते. मात्र सेवा करायची कशी? स्वामींना आपली इच्छा सांगायची कशी? हेच अनेकांना माहिती नसते. त्यामुळे नियमांचे पालन न करता जर चुकीच्या पद्धतीने सेवा करत राहाल तर त्याचे फळ मिळणे अवघड होते. त्यामुळे श्रावणातील गुरुवारी एका सोप्या मंत्रसेवेने स्वामींना प्रसन्न कसे करावे, हे आपण पाहूया.

**स्वामीसेवा करताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात**

स्वामींची सेवा करताना सर्वप्रथम आपले अंतःकरण विचार शुद्ध करायला हवे. त्यानंतर स्वामींप्रती पूर्णपणे समर्पण असायला पाहिजे. विश्वास ठेवून सेवा केली तरच ती फलित होते. 'मनी नाही भाव आणि देवा मला पाव' असे करून चालत नाही. मनात भक्तीभाव ठेवून तुम्ही स्वामींसमोर पूर्ण समर्पणाने बसा, त्यांना तुमच्या अडचणी, दुःख सर्वकाही माहिती असते. परंतु तरी देखील स्वामींना आपलेपणाने मनातील इच्छा सर्व गोष्टी सांगा आणि स्वामीसेवेचा संकल्प घेऊन नियमित स्वामीसेवा करा. स्वामीसेवेत स्वतःला झोकून द्या. स्वामी तुमचे कर्म आणि निष्ठा पाहतात. या गोष्टींमध्ये तुम्ही पास झालात की तुमच्या आयुष्यातील मार्ग स्वामी स्वतः बनवितात.



**श्रावणातील गुरुवारी कोणता मंत्र म्हणावा?**

स्वामींचे एक वाक्य प्रत्येकाला आधार देते ते म्हणजे 'अशक्य ही शक्य करतील स्वामी.' या एका वाक्यात प्रचंड शक्ती आणि आपलेपणा असल्याचे जाणवते. जणू काही स्वामी स्वतः आपल्या डोक्यावर हात ठेवून बाळा काळजी करू नकोस, मी तुझ्या सोबत आहे, असे सांगत असल्याचे भासते. हेच वाक्य आहे स्वामींच्या तारकमंत्रामध्ये. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या तारकमंत्रात खरोखरच जादू आहे. हा मंत्र नियमित म्हटल्याने मनातील भीती दूर होते. सकारात्मकता येते. कुटुंबातील वातावरण प्रसन्न होते आणि आयुष्यात सुख-समृद्धी येऊ लागते. तसेच यामुळे स्वामीकृपा देखील मिळते, असे मानतात. त्यामुळे श्रावणातील गुरुवारी तारकमंत्र अवश्य म्हणावा.

**श्रावणातील गुरुवारी तारकमंत्र कसा म्हणावा?**

श्रावणातील गुरुवारी लवकर उठून स्नान झाल्यानंतर आपल्या घरातील पूजाघरात स्वामींचा अभिषेक करावा. स्वामींना पुष्पहार, धूप, तुपाचा दिवा लावून नमस्कार करावा. कोणताही गोड नैवेद्य स्वामींना दाखवावा, जमल्यास बेसनाचे लाडू नैवेद्यात ठेवावे. मग श्री स्वामी समर्थ नामाची एक जपमाळ करावी. त्यानंतर तुम्ही तारकमंत्राचे पठण करावे. मात्र, यावेळी तारकमंत्र म्हणताना स्वामींसमोर एका पेल्यात पाणी ठेवावे. त्यानंतर तारकमंत्र तुम्ही किमान ७ ते ११ वेळा म्हणावा. शांत चित्ताने मन पूर्णपणे एकाग्र करून श्रावणातील एका गुरुवारी थोडा वेळ काढून स्वामींसमोर मनात इच्छा ठेवून किमान ११ वेळा तारकमंत्र म्हणावा. त्यानंतर पेल्यातील पाणी प्यावे व स्वामींना नमस्कार करावा. आरती करून सर्वांना प्रसाद वाटावा. जमल्यास श्रावणातील गुरुवारी स्वामींच्या मठात अथवा केंद्रात जाऊन दर्शन घ्यावे.

# श्रावणातील

## श्री नवनाथ पारायणाचे काय आहे महत्त्व?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिना सुरू झालेला आहे. श्रावणात श्री नवनाथ ग्रंथाच्या पारायणास खूप महत्त्व आहे. त्यामुळे जाणून घेऊ या नवनाथ ग्रंथ पारायणाचे महत्त्व.

**नवनाथ पारायण करण्याचे महत्त्व**

**अध्याय १ ला :** समंधबाधा नाहीशी होऊ शकते.
**अध्याय २ रा :** धनप्राप्ती होऊन आपले कर्म सफल होते.
**अध्याय ३ रा :** शत्रूचा नाश, मुष्टियुद्ध, विद्येची प्राप्ती, घरात मारुतीचे वास्तव्य.
**अध्याय ४ था :** कपटाची बंधने सुटतील,शत्रूचा पराभव,राजदरबारी मान.
**अध्याय ५ वा :** घरात भूतबाधा असेल, तर थांबेल व पुन्हा होणार नाही.
**अध्याय ६ वा :** शत्रूचे हृदय पालटेल, त्याच्या मनातील कपट जाऊन तो मित्र होईल.
**अध्याय ७ वा :** ८४ लाख योनीत जन्म येणार नाही. व्यथा, चिंता संपेल.
**अध्याय ८ वा :** दूरदेशी गेलेला मित्र परत येईल. काळजी संपेल.
**अध्याय ९ वा :** चौदा विद्या व चौसष्ट कला प्राप्त होऊ शकतील.
**अध्याय १० वा :** स्त्री दोष नाहीसे होतील. मन सात्विक होईल. मुले जगतील.
**अध्याय ११ वा :** अग्निपीडा दूर होईल, गृहदोष संपतील, संततीची प्राप्ती होईल.
**अध्याय १२ वा :** देवतांचा क्षोभ संपेल व देवता अनुग्रह करतील.
**अध्याय १३ वा :** स्त्री हत्येचा दोष संपेल व पूर्वजांचा उद्धार होईल.
**अध्याय १४ वा :** कारागृहातून सुटका, निर्दोषपणे लोकांत राहता येईल.
**अध्याय १५ वा :** घरातील भांडणे थांबून सुख-शांती लाभेल.
**अध्याय १६ वा :** वाईट स्वप्नांचा नाश होईल.
**अध्याय १७ वा :** योगसिद्धी लाभेल व सन्मार्गाची प्राप्ती होईल.
**अध्याय १८ वा :** ब्रह्महत्येचा दोष संपेल, कुंभीपाक नरकातून पितरांचा उद्धार होईल.
**अध्याय १९ वा :** परमानंददायी मोक्षमार्ग खुला होईल.
**अध्याय २० वा :** मन ताब्यात येऊन प्रपंच सुखी होईल.
**अध्याय २१ वा :** गोहत्येचे पातक संपेल व तपोलोकात प्रवेश होईल.
**अध्याय २२ वा :** ज्ञानसंपन्न मुलगा होईल व तो विद्वानांना मान्य होईल.
**अध्याय २३ वा :** घरातील सुवर्ण टिकून राहील.
**अध्याय २४ वा :** बालहत्या दोष संपेल व मुले सुखी होतील.
**अध्याय २५ वा :** शाप लागणार नाही, मनुष्य जन्म मिळून सुंदर स्त्री व पुत्र लाभेल.
**अध्याय २६ वा :** गोहत्येचा दोष संपेल व मुले शत्रुतुल्य होणार नाहीत.
**अध्याय २७ वा :** हरवलेली वस्तू मिळेल, गेलेला अधिकार परत मिळेल.
**अध्याय २८ वा :** गुणवान स्त्रीशी लग्न होईल व ती अखंड सेवा करेल.
**अध्याय २९ वा :** क्षयरोग बरा होऊन त्रिविध ताप संपेल.
**अध्याय ३० वा :** चोरांची दृष्टी नाहीशी होईल.
**अध्याय ३१ वा :** शाबरी मंत्राचे कपटी प्रयोग आपणावर होणार नाहीत.
**अध्याय ३२ वा :** गंडांतरे संपतील,आयुष्य वाढेल.
**अध्याय ३३ वा :** धनुर्वात होणार नाही व झाला असेल तर बरा होईल.
**अध्याय ३४ वा :** सर्व कर्मसिद्धी होऊन जीवन यशस्वी होईल.
**अध्याय ३५ वा :** महासिध्दी प्राप्त होऊन बेचाळीस पिढ्यांचा उध्दार होईल.
**अध्याय ३६ वा :** साप व विंचू यांचे विष उतरून मनुष्य बरा होईल.
**अध्याय ३७ वा :** दुःशीलपणा संपून विद्या प्राप्त होईल.
**अध्याय ३८ वा :** हिवताप, नवज्वर व इतर ताप नाहीसे होतील.
**अध्याय ३९ वा :** युध्दात विजय प्राप्त होऊ शकेल.
**अध्याय ४० वा :** कामधेनूप्रमाणे सर्व इच्छा पूर्ण होतील. संपूर्ण नवनाथ वाचनाने पुण्य वाढेल.

# श्रावण महिना दोनदा का येतो?

## जाणून घ्या उत्पत्ती, धार्मिक महत्त्व आणि शास्त्रीय कारण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मामध्ये श्रावण महिना शुभ आणि पवित्र मानला जातो. श्रावण महिना भगवान शिवांना समर्पित आहे. मात्र, कधी-कधी असा प्रश्न पडतो, की विविध तारखांना दोन श्रावण का येतात? जाणून घेऊ यामागे धार्मिक तसेच खगोलशास्त्रीय कारण.

**श्रावण दोन वेळा का येतो?**

प्रत्यक्षात श्रावण महिना दोनदा येत नाही. परंतु भारतात दोन वेगवेगळ्या पंचांग पद्धती वापरल्या जात असल्यामुळे श्रावणाच्या तारखा वेगळ्या असतात.

**अमांत पंचांग**

महाराष्ट्र, गुजरात, गोवा, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात प्रामुख्याने अमांत पंचांग वापरले जाते. या पद्धतीनुसार महिना अमावास्येला संपतो. त्यामुळे श्रावणाची सुरूवात आणि समाप्ती वेगळ्या तारखांना होते.

**पूर्णिमांत पंचांग**

उत्तर भारतातील उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि दिल्लीसह अनेक भागांत पूर्णिमांत पंचांग वापरले जाते. या पद्धतीनुसार महिना पौर्णिमेला संपतो. त्यामुळे श्रावण महिन्याच्या तारखा अमांत पंचांगापेक्षा सुमारे १५ दिवसांनी बदलतात. यामुळे अनेकांना असे वाटते, की श्रावण महिना दोनदा येतो. पण प्रत्यक्षात तो एकच महिना असून दोन वेगवेगळ्या कालगणना पद्धतींमुळे तारखांमध्ये फरक पडतो.

**दोन वेळा श्रावण कधी येतात?**

काही वर्षी अधिक मास (अधिमास) आल्यामुळे एखादा चांद्र महिना सलग दोनदा येऊ शकतो. याला 'अधिक श्रावण' आणि 'निज श्रावण' असे म्हटले जाते. हे साधारणपणे दोन ते तीन वर्षांनी एकदा घडते. सूर्य आणि चंद्राच्या कालगणनेतील फरक भरून काढण्यासाठी अधिक मास जोडला जातो.



**श्रावणाची उत्पत्ती कशी झाली?**

श्रवण नक्षत्रावरून श्रावण महिन्याचे नाव पडले आहे. पौर्णिमेच्या सुमारास चंद्र श्रवण नक्षत्राजवळ असतो. त्यामुळे या महिन्याला 'श्रावण' असे नाव मिळाले.

**पौराणिक महत्त्व**

समुद्रमंथनावेळी हलाहल विष बाहेर आले तेव्हा भगवान शिवांनी ते प्राशन करून सृष्टीचे रक्षण केले. विषाचा दाह कमी करण्यासाठी देवांनी शिवांवर जलाभिषेक केला. याच परंपरेतून श्रावण महिन्यात भगवान शिवांना जल, दूध, बेलपत्र अर्पण करण्याची प्रथा सुरू झाली, असे मानले जाते.

**धार्मिक महत्त्व**

श्रावण हा पाऊस, शेती आणि निसर्गाच्या नवचैतन्याचा काळ आहे. या महिन्यात सोमवारी शिवपूजा, मंगळागौर व्रत, नागपंचमी, रक्षाबंधन, श्रावणी उपाकर्म अशा अनेक धार्मिक उत्सवांची रेलचेल असते. शिवभक्तांसाठी हा महिना अत्यंत पुण्यदायी मानला जातो.

**यंदा श्रावण कधी संपेल?**

यंदा श्रावणाला गुरुवार, १३ ऑगस्ट रोजी सुरूवात झाली असून, तो ११ सप्टेंबर २०२६ रोजी संपणार आहे.

# गुरुवारी ही व्रत कथा नक्की वाचा!

## कधीच कोणत्याही गोष्टीची कमतरता भासणार नाही

हे पाहून दासी खूप आश्चर्यचकित झाली, तिने राणीला सर्व काही सांगितले आणि म्हणाली, की जेव्हा आम्हाला धान्य मिळत नाही, तेव्हा आम्ही उपवास करतो, आपण त्यांना उपवास करण्याची पद्धत आणि कथा का विचारत नाही जेणेकरून आम्ही गुरुवारच्या व्रताची कथा देखील करू शकू. मग राणीने तिच्या बहिणीला गुरुवारबद्दल विचारले, राणीच्या बहिणीने सांगितले की गुरुवारी उपवासात केळीच्या झाडाच्या मुळाची डाळ आणि मनुका घालून पूजा करा, दिवा लावा आणि कथा ऐका आणि उपवासात फक्त पिवळे अन्न खा, जेणेकरून देव प्रसन्न होईल आणि इच्छा पूर्ण करेल. राणीची बहीण व्रताची पूजा करण्याची पद्धत आणि कथा सांगून घरी परतली. एका आठवड्यानंतर गुरुवार आला, त्यानंतर राणी आणि दासींनी व्रत केले. दासी गोठ्यात गेली आणि उपवासाचे साहित्य आणले, नंतर केळीच्या झाडाच्या मुळाची आणि भगवान विष्णूंची पूजा केली आणि कथा ऐकली.

दोघांनीही व्रत केले आणि विचार केला की त्यांना पिवळे अन्न कुठून मिळेल. दोघीही खूप दुःखी होत्या, परंतु त्यांनी उपवास केल्यामुळे गुरु भगवान आनंदी झाले. ते एका सामान्य व्यक्तीच्या वेषात २ ताटांत सुंदर पिवळे पदार्थ घेऊन आले आणि दासीला दिले आणि म्हणाले, हे पदार्थ तुमच्यासाठी आणि तुमच्या राणीसाठी आहे, तुम्ही दोघांनीही ते खावे. अशाप्रकारे, राणी आणि दासी गुरुवारी उपवास आणि पूजा करू लागल्या.

गुरू भगवानांच्या कृपेने त्यांना धन मिळाले. त्यानंतर राणी पुन्हा पूर्वीसारखी आळशी होऊ लागली. मग दासी राणीला म्हणाली बघा, तुम्ही पूर्वीही आळशी होता, म्हणूनच तुम्हाला त्रास होत होता, त्यामुळे सर्व संपत्ती नष्ट झाली. आता देवाच्या कृपेने तुम्हाला संपत्ती मिळाली आहे, तेव्हा तुम्ही पुन्हा आळशी झाला आहात. खूप त्रासानंतर आम्हाला ही संपत्ती मिळाली आहे, म्हणून आपण दान केले पाहिजे आणि तुम्ही भुकेल्या लोकांना अन्न द्यावे, पाणी प्यावे, अविवाहित मुलींचे लग्न करावे. यामुळे तुमची कीर्ती वाढेल आणि पूर्वज आनंदी होतील. दासीच्या सल्ल्यानुसार राणी शुभ कार्य करू लागली. यामुळे संपूर्ण शहरात राणी आणि दासीची कीर्ती वाढू लागली.

येथे जंगलात, राजा दुःखाने झाडाखाली बसला आणि त्याच्या जुन्या गोष्टी आठवून रडू लागला. मग गुरु भगवान संताच्या रूपात लाकूडतोड्याकडे आले आणि म्हणाले, अरे लाकूडतोड्या, मला सांगा की तुम्ही या निर्जन जंगलात काळजीत का बसला आहात. मग लाकूडतोड्याने हात जोडून संताला सांगितले, तुम्हाला सर्व काही माहित आहे. मी तुम्हाला काय सांगू, असे म्हणत राजाने संताला त्याची संपूर्ण स्थिती सांगितली. मग संताने त्याला सांगितले की तुझ्या राणीने भगवान बृहस्पतींचा अपमान केला आहे ज्यामुळे तुझी वाईट अवस्था झाली आहे, आता तू कशाचीही काळजी करू नकोस, तुझे सर्व दुःख दूर होतील आणि तू पूर्वीपेक्षा श्रीमंत होशील. जीवनात आनंद मिळवण्यासाठी गुरुवारी उपवास कर, यामुळे तुझे दुःख दूर होईल.

यासाठी गुरुवारी केळीच्या झाडाची आणि भगवान बृहस्पतीची हरभरा आणि मनुका घालून पूजा कर आणि उपवास कर, ज्यामुळे तुझे दुःख दूर होईल. संताचे म्हणणे ऐकून राजा म्हणाला की लाकूड विकून मला पुरेसे पैसे मिळत नाहीत जेणेकरून मी खाल्ल्यानंतर काही साठवू शकेन. मी रात्री माझ्या राणीला दुःखी पाहिले आहे. माझ्याकडे तिच्याबद्दल जाणून घेण्याचे कोणतेही साधन नाही. लाकूडतोड्याचे म्हणणे ऐकून संत म्हणाला की तू कशाचीही काळजी करू नकोस, तू नेहमीप्रमाणे लाकूड घेऊन जा, तुला नेहमीपेक्षा दुप्पट पैसे मिळतील, ज्याने तू पूजा करुन अन्न देखील खाऊ शकशील.



हळूहळू वेळ गेला आणि मग गुरुवार आला. लाकूडतोडा जंगलातून लाकूड तोडून शहरात लाकूड विकायला गेला, त्या दिवशी त्याला इतर दिवसांपेक्षा जास्त पैसे मिळाले. राजाने सामान आणले आणि गुरुवारी उपवास केला, त्या दिवसापासून त्याचे सर्व दुःख दूर झाले. पण जेव्हा पुढचा गुरुवार आला तेव्हा राजा उपवास करायला विसरला, त्यामुळे गुरु भगवान रागावले. त्या दिवशी त्या नगराच्या राजाने एक मोठा यज्ञ आयोजित केला होता आणि शहरातील लोकांना त्यांच्या घरात अन्न शिजवू नये अशी आज्ञा दिली होती. त्याने असेही म्हटले होते की जो कोणी राजाचा आदेश मानणार नाही त्याला फाशी दिली जाईल. अशा प्रकारे राजाच्या आदेशानुसार, शहरातील सर्व लोक जेवायला गेले, परंतु लाकूडतोडा थोडा उशिरा आला, म्हणून राजा त्याला सोबत घेऊन गेला आणि त्याला एकत्र जेवू घालत होता. मग राणीची नजर तिच्या हार असलेल्या खुंटीवर पडली. तिला खुंटीवरचा हार दिसला नाही. मग राणीने ठरवले की या लाकूडतोड्याने माझा हार चोरला आहे.

लाकूडतोड्याला तुरुंगात टाकण्यात आले. तुरुंगात गेल्यानंतर, राजा खूप दुःखी झाला आणि त्याच्या जुन्या गोष्टी आठवून रडू लागला. तेव्हा बृहस्पती देव एका संताच्या रूपात प्रकट झाले आणि त्यांची अवस्था पाहून म्हणाले की तुम्ही बृहस्पती देवाची कथा केली नाही, म्हणूनच तुम्हाला हे दुःख झाले आहे. आता कशाचीही काळजी करू नका. गुरुवारी तुला तुरुंगाच्या दारावर चार नाणी पडलेली आढळतील. त्याद्वारे तू गुरुवारची कथा सांग. तुझे सर्व त्रास दूर होतील. गुरुवारी त्याला चार नाणी मिळाली आणि त्याने राजा बृहस्पती देवाची कथा सांगितली. त्या रात्री भगवान बृहस्पती त्या नगराच्या राजाच्या स्वप्नात आले आणि म्हणाले की ज्या लाकूडतोड्याला तुम्ही कैद केले आहे त्याला सोडले पाहिजे. तो निर्दोष आहे. जर तुम्ही असे केले नाही तर मी तुमचे राज्य नष्ट करीन.

(क्रमशः)

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)